## प्रकरण पहिले
## संशोधन समस्या

### १.१ प्रास्ताविक :-

आपला देश स्वतंत्र होउन ५० वर्षे झाली. या ५० वर्षात शेती, उदयोगधंदे, विज्ञान, वाहतुकीची साधने, आरोग्य इ. अनेक क्षेत्रामध्ये आपण प्रगती केली आहे . लोकशाही मार्गाने वाटचाल करणारा भारत हा जगातील सर्वात मोठा देश आहे. तरी आपल्या देशाच्या प्रगतीच्या मार्गातील समस्या जाणन त्या दूर करणे आवश्यक आहे. त्या समस्यामध्ये लोकसंख्या वाढ, पर्यावरणाचा वाढता -हास, बालमृत्यूचे प्रमाण, स्त्रियांची दुरावत, सांप्रदायिकता, जातीयता अशा अनेक समस्यांचे गांभीर्य आणि नेमकेपणा ध्यानात घेण्यासाठी लागणारे 'किमान मूलभूत शिक्षण' बहुसंख्य लोकांकडे नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामूळे भारतात 'निरक्षरता' हे एक प्रचंड आव्हान आहे.

भारतातील निरक्षरतेचे स्वरूप :-

सन १९५१ साली आपल्या देशात फक्त अठरा टक्के लोक साक्षर होते. १९६१ साली ते प्रमाण २८ टक्के व १९७१ मध्ये ३४ टक्के तर १९८१ साली ते ४३ टक्के साक्षर होते. १९९१ च्या जनगणेनूसार साक्षरतेचे प्रमाण ५२.११ टक्के होते, पैकी ६४ टक्के पुरूष व ३९ टक्के स्त्रिया साक्षर होत्या यावरून निरक्षरतेच्या समस्येचे भयावह स्वरूप लक्षात येते. आणि त्या समस्येकडे गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे हे लक्षात येते.

भारताची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. त्याबरोबरच विविध उपायामुळे साक्षरतेचे प्रमाण कमी होत आहे. तथापि वाढणा-या लोकसंख्येमुळे निरक्षरांची एकूण संख्या आव्हानात्मक आहे. निरक्षर महिलांचे प्रमाण तर ६० टक्के आहे.

महाराष्ट्रात प्रतिवर्षी साक्षरतेचे प्रमाण जवळ-जवळ एक टक्क्याने वाढत असले तरी लोकसंख्या वाढीचे प्रमाण दरवर्षी वाढतच आहे.

आपल्या देशातील प्रौढ शिक्षण कार्यक्रमाची पध्दतशीर सुरवात ऑक्टोबर १९७८ मध्ये कार्यान्वित करण्यात आलेल्या 'राष्ट्रीय प्रौढ शिक्षण' कार्यक्रमाने झाली. तसेच १९८६ साली 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' जाहीर झाले. त्यात संपूर्ण देशाने निरक्षरतेचे समूळ उच्चाटन केले पाहिजे असे म्हटले आहे. प्रौढ शिक्षण शासकीय यंत्रणे पुरते मर्यादित न राहता सेवाभावी संस्थांचा व व्यक्तींचा सहभाग त्यात जास्तीत जास्त मिळावा व हया कार्यक्रमाला 'जन आंदोलनाचे' 'लोक चळवळीचे' स्वरूप यावे, या उद्देशाने व १५ ते ३५ वयोगटातील निरक्षरांना साक्षर करण्यासाठी कटिबंध झाले पाहिजे म्हणून सन १९८८ साली केंद्र शासनाने 'राष्ट्रीय प्रौढ शिक्षण मिशनची' स्थापना केली आणि देशाच्या विविध भागात संपूर्ण साक्षरता अभियान सुरु करण्यात आले. या अभियानात 'जिल्हा' हा घटक मानण्यात आला आहे. अभियानाच्या यशस्वितेसाठी जिल्हा, तालुका व गाव पातळीवर समित्यांची स्थापना करण्यात आली. या समित्यांमध्ये त्या स्तरांवरील लोक प्रतिनिधि प्रशासकीय अधिकारी, शिक्षक, प्राध्यापक, पत्रकार, समाजसेवी संघटना व महिला मंडळ यांचा समावेश केलेला आहे.

साक्षरता अभियाना अंतर्गत सोलापूर जिल्हयात आज सर्वत्र साक्षरतेचे वारे वाहत आहे. १५ ते ३५ वयोगटातील निरक्षरांना साक्षर करण्यासाठी शिक्षक, स्वयंसेवी संघटना, आठवी नववीतील मुले मुली, बेकार तरूण तरूणी, तरूण मंडळे, कार्यकर्ते, नेते मंडळी, सेवानिवृत व्यक्ती उभे राहत आहेत. एप्रिल १९९५ मध्ये प्राथमिक शिक्षकांमात १५ ते ३५ वयोगटातील निरक्षरांचा सर्वे करण्यात आला त्यानुसार संपूर्ण सोलापूर जिल्हयात निरक्षरांची संख्या २,७५,५०३ एवढी आहे. आणि उत्तर सोलापूर तालूक्यात निरक्षरांची संख्या १७,८०६ एवढी आहे. त्यामध्ये स्त्री निरक्षरांची संख्या ९,४८५ एवढी आहे. विशेषत: या साक्षरता चळवळीचा भार प्रामुख्याने प्राथमिक शिक्षकांवर सोपविलेला आहे. आणि शिक्षकावरच या साक्षरता अभियानाची यशस्वीता अवलंबून आहे. त्यामूळे शिक्षक हा या योजनेतील अत्यंत महत्वाचा घटक आहे.

प्रथम शिक्षकांचे मार्फत १५ ते ३५ वयोगटातील निरक्षरांचा सर्वे करण्यात आला. नंतर साधन व्यक्ती, मास्टर टेनर्स, स्वयंसेवक यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. उत्तर सोलापूर साक्षरता अभियानाच्या वतीने वातावरण निर्मिती करण्यात आली. त्यामध्ये कलाजत्था कार्यक्रम, महिला मेळावे, घोषवाक्ये, पोस्टर्स बनर्स लावणे, साक्षरता दिंडी, हळदी कुंकू कार्यक्रम, भजनी मंडळ, आकाशवाणी, वर्तमानपत्रानी प्रसिध्दी दिलेली आहे. सरपंच-तलाठी मेळावे, गावचावडी कार्यक्रम, निरक्षर मेळावे आदी उपक्रम घेण्यात आले. निरक्षरांसाठी पाटी,

पेन्सिल स्वंयसेवंकासाठी खडू, फळा, मार्गदर्शिका, हजेरी पुस्तिका, आपले शिक्षण भाग १,२,३, दिली आहेत. तसेच अभियान यशस्वी होणेसाठी जनवाचन आंदोलन व विविध समित्या निर्माण करून प्रत्येक समितीला त्यांच्या कामाचे स्वरूप व काही मार्गदर्शक तत्वांची माहिती दिलेली आहे. त्यामध्ये नियंत्रण समिती, सर्वेक्षन समिती, वातावरण निर्मिती समिती, शैक्षणिक साहित्य समिती, अर्थ समिती, कार्यकारी समिती अशा समित्या आहेत. तालुका पातळीवर तालुका साक्षरता समिती व ग्रामपातळीवर ग्रामसाक्षरता समिती ही पायाभूत समिती आहे. या मध्ये सरपंच, स्थानिक प्रमुख व्यक्ती, स्थानिक प्राथमिक शाळा, माध्यमिक मुख्याध्यापक, महिला मंडळ प्रतिनिधी, सेवानिवृत्त कर्मचारी, दानशूर व्यक्ती, तरूण मंडळे, गणेश मंडळे, क्रिडामंडळाचे प्रतिनिधी यांचा समावेश आहे. तसेच संपूर्ण अभियान यशस्वी करण्याच्या दृष्टीने प्रत्येक टप्प्यावर बारकाईने निरिक्षण व पर्यवेक्षण ठेवले आहे.

4

## १.२ संशोधन अभ्यासाची गरज

'निरक्षरता' हा भारतीय समाजाला लागलेला एक कलंक आहे. भारत इतर विकसीत देशाच्या तुलनेने मागासलेला आहे. भारतातील अनेक वाईट चालीरीती, रूढी, परंपरा, अंधश्रध्दा यांना चालना भारतात असलेल्या निरक्षर समाजाकडून मिळते. भारतात ज्या काही प्रमुख समस्या आहेत. त्या समस्यांच्या पाठीमागे निरक्षरता हे एक कारण आहे.

साक्षरता अभियानाची गरज पुढील बाबींवरून स्पष्ट होते.

- अजूनही देशात जवळ -जवळ निम्मे लोक निरक्षर आहेत. निरक्षर महिलांचे प्रमाण तर ६० टक्के आहे.
- महाराष्ट्रात प्रतिवर्षी साक्षरतेचे प्रमाण जवळ- जवळ एक टक्याने वाढू लागले असले तरी लोकसंख्या वाढीचे प्रमाण जवळ -जवळ २.५ टक्के आहे. परिणामी निरक्षरांची संख्या ही वाढतच आहे.
- प्राथमिक शिक्षणाच्या कमतरतेमुळे प्रौढांची निरक्षरता वाढत राहते. आणि प्रौढांच्या निरक्षरतेमुळे प्राथमिक शाळामंधील गळती चालू राहते. व गळतीमुळे प्रौढ निरक्षरांच्या संख्येत सतत वाढ होत राहते. या साठी एकाच वेळी दोन्ही बाजूंनी प्रयत्न व्हावयास हवा.
- विकासाच्या अनेक प्रकारच्या योजना असून ही अनेक प्रौढ स्त्री-पुरूष निरक्षर असल्याने त्यांचा पुरेपूर लाभ घेउ शकत नाहीत.
- त्यांची दैनंदिन कामेही परंपरागत पध्दतीने चालू राहतात. त्यामूळे कामाचा वेग व गुणवत्ता यात ते मागे पडतात.
- वाढते अज्ञान व दारिद्य यामुळे छोटया कुटूंबाचे महत्व लक्षात न येवून जनन प्रमाण वाढत राहते. त्याचे दुष्परिणाम जन्मास येणा-या बालकांना व त्या कुटूंबाना जसे भोगावे लागतात. तसेच त्यामुळे समाज विकासाच्या वेगालाच खिळ बसते.
- लोकसंख्या वाढीच्या वेगाप्रमाणेच सामाजिक व आर्थिक विषमता , पर्यावरणातील वाढते प्रदूषण ,पाणी प्रश्न, हुंडा बळी , वैज्ञानिक दृष्टीचा अभाव , अंधश्रध्दा यासारखे प्रश्न समर्थ पणे सोडविण्यासाठी समाजाच्या तळापर्यंत अजूनही पूरेशी जागृकता आलेली दिसत नाही.

- जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश असा आपला गौरव होत असतानाच जगातील सर्वात मोठा निरक्षरांचा देश म्हणून आपली अवहेलना ही होते. त्यामुळे या शतकाअखेर जगातील जवळ -जवळ निम्मे निरक्षर एकट्या भारतात असण्याचा धोका संभवतो.
- लोकशाहीत प्रत्येक नागरिकामध्ये आपले हक्क व कर्तव्ये यांची पूरेपूर जाणीव अजून ही विकसित झालेले दिसत नाहीत.
- निरक्षरतेने भाबडेपणा जोपासला जातो. साधक बाधक विचार करण्याची प्रक्रिया वेग घेत नाही. चोखसपणा , चिकित्सकपणा, निर्णयक्षमता यासार खे गुण विकसित होण्यासाठी शिक्षणाचे लेणं सर्वांपर्यंत पोहचणे आवश्यक ठरते.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने प्रत्येक स्त्री पूरूषास महत्वाची साधन संपत्ती मानले असून त्यांच्या विकासावर होणारा खर्च ही गुंतवणूक मानली आहे. त्यांची निकड लक्षात घेउन प्राथमिक शक्षणाचे सार्वत्रिकरण आणि निरक्षरता निर्मूलन या जोड कार्य क्रमाला विशेष म हत्व दिले आहे.

एका अर्थ ने साक्षरता अभियानाची चळवळ ही दुस- या स्वातंत्र्याची लढाई आहे.

सन १९९१ च्या जनगणनेनूसार भारताची लोक संख्या ८४.३९ कोटी असून देशातील साक्षरतेचे प्रमाण ५२.११ टक्के इतके आहे. राहिलेले सर्व निरक्षर आहेत. त्यात स्त्रियांच्या निरक्षरतेचे प्रमाण पुरूषापेक्षा जास्त आहे. ही चिंताजनक बाब आहे. सन १९७८ पासून केंद्र सरकारने प्रौढ साक्षरता कार्यक्रम हाती घेतला होता. आणि तो सहा प्रकल्पांच्या स्वरूपात अस्तित्वात होता व या प्रकल्पांच्या साहयाने संपूर्ण साक्षरता गाठण्याचे लक्ष ठेवण्यात आलेले होते.

१. कार्यात्मक साक्षरता प्रकल्प.
२. राज्य, प्रौढ, शिक्षण कार्यक्रम.
३. स्वयंसेवी संस्थांमार्फत साक्षरता.
४. विदया थी यांच्यामार्फत साक्षरता.
५. श्रमिक विदयापीठामार्फत साक्षरता.
६. प्रौढ स्त्रीयांसाठी कार्यात्मक साक्षरता कार्यक्रम.

वरिल सर्व प्रकल्पांचा समावेश पंचवार्षिक योजनेत केला होता. व त्यावर मोठा खर्च केला गेला. परंतू संपूर्ण साक्षरता गाठण्यात अपयश आले म्हणून सन १९८६ मध्ये आखण्यात आलेल्या नवीन शैक्षणिक धोरणात प्रौढ शिक्षणाला महत्व देण्यात आले व कार्यात्मक साक्षरता वर्ग चालू करण्यात आले.

जे प्राथमिक शिक्षक सदर कामी सहभागी झालेले आहेत. त्यांच्या या कार्यात येणा-या समस्यांचा अभ्यास करून त्यांच्या कार्याची परिणामकारकता वाढवण्याच्या दृष्टीने एक शिक्षक या नात्याने प्रयत्न होणे अगत्याचे वाटते. संशोधिका स्वतः प्राथमिक शिक्षिका, मुख्याध्यापिका होती. आणि सध्या केंद्रप्रमुख व या साक्षरता अभियानात जिल्हा प्रौढ शिक्षण समन्वयक म्हणून काम पहात आहे. आणि हे कामकाज पहात असताना ब-याच अडचणी जाणवल्या आणि एक स्त्री म्हणूनही ब-याच समस्या जाणवल्या म्हणून या संशोधनाद्वारे प्राथमिक शिक्षिकांना साक्षरता अभियानात काम करताना त्यांचे दैनंदिन कामकाज पहात असताना येणा-या समस्या तसेच निरक्षर प्रौढ वर्गासाठी त्यांना द्यावा लागणारा वेळ व एक स्त्री म्हणून कामकाज पहात असताना येणा-या समस्या, तसेच त्या कामाची परिणामकारकता या बाबत अभ्यास होणे जरूरीचे वाटू लागले. तसेच त्यांच्या दैनंदिन अध्यापणात कोणत्या समस्या येतात. याचा अभ्यास करून त्यावर उपाय सुचविण्याच्या दृष्टीने संशोधिकेने हे संशोधन कार्य हाती घेतलेले आहे.

## १.३ संशोधन समस्येचे शब्दांकन

"उत्तर सोलापूर तालुक्यातील साक्षरता अभियानात प्राथमिक शिक्षिकांना येणा-या समस्यांचा अभ्यास करून त्यांची परिणामकारकता वाढविण्यासाठी उपाय योजना सुचविणे."

महत्वाच्या संज्ञाच्या व्याख्या

१. उत्तर सोलापूर तालुका

सोलापूर जिल्हयातील एकूण अकरा तालुक्यांपैकी एका तालुक्याचे नाव उत्तर सोलापूर.

२. साक्षरता अभियान

महाराष्ट्र शासनाने सन १९९६-९७ हे वर्ष साक्षरता वर्ष म्हणून घोषित केले. संपूर्ण जिल्हा स्तरांवर ही योजना राबविण्यासाठी जो आराखडा तयार केला आहे तो आराखडा म्हणजे "साक्षरता अभियान".

३. प्राथमिक शिक्षक

प्राथमिक स्तरावर अध्यापनाचे कार्य करणारे परंतु साक्षरता अभियान कार्यात प्रत्यक्ष सहभागी असलेले शिक्षक.

४. निरक्षर

ज्यांना लिहिता वाचता येत नाही अशा १५ ते ३५ वयोगटातील व्यक्ती.

## १.४ संशोधन अभ्यासाचे महत्व

जगातील लहान मोठ्या देशांनी निरक्षरता नष्ट करून आपापल्या देशात प्रचंड क्रांती केलेली आहे. अविरत प्रयत्न आणि योग्य नियोजन ही त्यांच्या यशाची मुख्य कारणे आहेत. येथेही साक्षरता हे सर्वांगीण प्रगतीचे साधन म्हणून प्रयत्न करण्यात आले आहेत. भारतालाही आता प्रौढ शिक्षण मोहिमेच्या द्वारे प्रचंड परिवर्तन घडवून आणावयाचे आहे. 'निरक्षरता' हा भारतीय समाजाला लागलेला कलंक साक्षरतेने धुतला जाणारा आहे. देशातील अनेक कुप्रथा, अंधश्रध्दा, चालीरीती यामुळे भारतीय समाजाचे मागासलेपण साक्षरतेमुळे दूर होणार आहे.

- अक्षरज्ञान व अंकज्ञान या बाबतीत निरक्षर स्वावलंबी होतील व कोणत्याही फसवणूकीस बळी पडणार नाहीत.
- अन्य कोणी बोलत असेल तर ते लक्ष पूर्वक ऐकणे , स्वत : मुध्देसुद बोलणे, शंका निवारणार्थ प्रश्न विचारणे , संभाषन करणे तसेच इतर अध्ययन कौशल्ये प्रौढात विकसित होतील व अधिकाधिक ज्ञान मिळवण्याची गोडी लागेल.
- सभोवतालचे झपाटयाने होणारे बदल लक्षात घेवून काहीना काही नवनवीन शिकत राहील.
- स्वत: करत असलेल्या व्यवसायातील नवे ज्ञान व नवी कौशल्ये मिळवून तो चांगला व फायदेशीर करण्याची जिद्द निर्माण होईल. व कालानुरूप नवीन उद्योग वा व्यवसाय निवडण्याकडे लक्ष जाईल.
- व्यवसायाच्या तसेच एकूण जीवनाच्या संदर्भात वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण होईल.
- आपले कुटूंब मर्यादित ठेवण्यासाठी छोटे कुटूंब ही संकल्पना त्यांच्या मनात रूजेल.
- सभोवतालच्या विकास कार्यक्रमांमध्ये जाणीव पूर्वक सहभागी होउन त्यांचा यथायोग्य लाभ घेण्याची क्षमता निर्माण होईल.
- नागरिकांचे हक्क व कर्तव्ये या संबंधी सुयोग्य जाण निर्माण व्हावी . व अज्ञान, दारिद्य आणि अगातिक्ता यामुळे होणा-या शोषणातून सुटका होण्यास होईल.
- व्यक्तीगत व सामुदायिक आरोग्य जोपासण्याकडे त्यांचे लक्ष वेधले जाउन उपलब्ध सुविधांचा लाभ घेण्यास प्रौढ प्रवृत्त होतील.

- स्वावलंबन, श्रमनिष्ठा. स्वच्छता. स्वाभिमान इ. मूल्ये जपत असतानाच आपला सर्वांचा मिळून उद्योगप्रधान, अध्ययनशील. विज्ञाननिष्ठ लोकशाही जपणारा व एकात्म असा समाज असावा. समाजाचा एक उपयुक्त घटक या नात्याने माणूस म्हणून जगण्याची जाणीव, क्षमता व जिद्द निरक्षर प्रौढांमध्ये विकसित होईल.
- मुली व स्त्रिया शिक्षणाने स्वावलंबी होउन समाजजीवनात नवनवीन जबाबदा-या घेण्यास समर्थ होतील व त्यांना समान संधी मिळून समानतेची योग्य संकल्पना निर्माण होईल. आत्मविश्वास वाढतो म्हणून शिक्षणाचा संबंध विकासाशी जोडणे आवश्यक असून देशाचा विकास हा देशातील जनता साक्षर आहे कि निरक्षर यावर अवलंबून आहे. यासाठी साक्षरता ही लोक चळवळ , जनसामान्यांची चळवळ , जनजागृतीची चळवळ "**Sence of Consciousness**" झाली पाहीजे.

सदरहू संशोधनाचा उपयोग राज्यपातळीवर संशोधन करण्याकरिता ,विशिष्ट क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींना, सामाजिक संस्थाना, स्वयंसेवी संघटना, व्यवस्थापन मंडळ, शासनाचे प्रतिनीधी यांना साक्षरता चळवळ राबविणा-यांना होणार आहेच. याशिवाय निरक्षर व्यक्तीस याचा जास्त फायदा होणार आहे.

## १.५ संशोधनाची उद्दीष्टे

संशोधनाची संशोधन करण्यापूर्वी संशोधनाची पुढीलप्रमाणे उद्दीष्टे निश्चित केलेली आहेत.

१. साक्षरता अभियानाचे कार्य करताना प्राथमिक शिक्षिकांना अध्यापनात येणा-या अडचणींना अभ्यास करणे.

२. शैक्षणिक साहित्याच्या संदर्भात येणा-या समस्यांचा अभ्यास करणे

३. अध्यापन पध्दती व पाठ्यांश यांची सांगड घालताना येणा-या समस्यांचा अभ्यास करणे.

४. प्रत्यक्ष कार्य करताना येणा-या परिसरातील अडचणीचा अभ्यास करणे.

५. शहरी व ग्रामीण भागातील अडचणींचा तुलनात्मक अभ्यास करणे.

६. अध्यापन कार्यात येणा-या अडचणींवर उपाय योजना सुचविणे.

## १.६ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

### अ) व्याप्ती

या संशो धनाचा उपयोग शिक्षिका, सरकारी अधिकारी, कुटूंबातील व्यक्ती, राज्य सरकार, जिल्हा, तालुका स्तरावर प्रौढ शिक्षण वर्ग चालवताना तसेच इतर संशोधकांना याचा फायदा होणार आहे. याशिवाय स्वयंसेवी संस्था, तज्ञ व्यक्ती, अभ्यासक्रम राबविताना स्वयंसेवकांना प्रौढ शिक्षण कार्यक्रमांचे स्वरूप ठरविताना होणार आहे. राज्य सरकारची ही मोहीम असल्याने तिचे नियोजन व आखणी दर्जेदार करून यशस्वी अंमलबजावणी करण्याचा पूर्व तयारीसाठी याचे मार्गदर्शन होणार आहे.

सदर तालुक्यात हद्दवाढ (शहरी) भाग व ग्रामीण भाग या दोन्हींचा समावेश होतो. त्यामूळे दोन्ही भागातील समस्या थोड्याफार वेगळ्या आहेत. म्हणून दोन्ही भागातील अडचणींचा तुलनात्मक अभ्यास करण्या च्या हेतून सदर तालुका निवडण्यात आला आहे.

### ब) मर्यादा

या संशोधनात सोलापूर जिल्हयातील अकरा तालुक्यापैकी केवळ एक तालुका म्हणजे 'उत्तर सोलापूर' याचा विचार करण्यात येणार असून सदर तालुक्यातील केवळ साक्षरता अभियानात काम करणा-या शिक्षिकां पूरतेच मर्यादित आहे. त्यापुरतेच मर्यादित स्वरूपाचे हे संशोधन का र्य केलेले आहे. त्यापूरतेच मर्यादित आहे. या संबंधात संशोधिकेने प्रयत्न पूर्वक उपाय सुचविलेले आहेत.

## १.७ प्रकरणीकरण

प्रस्तुत संशोधनाचे संदर्भात संकलित केलेल्या माहितीची मांडणी संशोधिका पुढील प्रमाणे प्रकरणीकरण करून मांडणी करणार आहे.

प्रकरण १ ले <u>प्रास्ताविक</u>

संशोधन समस्ये संबंधी प्रास्ताविक प्रस्तुत प्रकरणात केले आहे.

प्रकरण २ रे <u>संबंधित साहित्याचा अभ्यास</u>

प्रस्तूत प्रकरणात संशोधन समस्येचे संदर्भात झालेल्या संशोधनाचा आढावा घेण्यात आला आहे.

प्रकरण ३ रे <u>साक्षरता अभियान योजना</u>

प्रस्तुत प्रकरणामध्ये साक्षरता अभियान योजने संबंधी माहिती व त्यामध्ये कार्यरत असलेले घटक व त्या संदर्भातील माहिती देण्यात आली आहे.

प्रकरण ४ <u>संशोधन पध्दत</u>

प्रस्तुत संशोधन समस्येच्या संदर्भात माहिती संकलीत करण्यासाठी वापरावायाच्या संशोधन पध्दतीचा ऊहापोह करण्यात आला आहे.

प्रकरण ५ वे <u>संशोधन सामग्रीचे विश्लेषण, अर्थनिर्वचन व अन्वयार्थ लावणे</u>

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन सामग्रीचे विश्लेषण करून त्याचे अ र्थ निर्वचन केले आहे. केलेल्या अ र्थ निर्वचनावरून त्याचा अन्वया र्थ लावण्यात आला आहे.

*प्रकरण ६ वे* *निष्कर्ष व शिफारशी*

*प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन सामग्रीचे विश्लेषन अर्थ निर्वचन व अन्वयार्थावरून शिफारशी केल्या असून तसेच पुढील संशोधनासाठी विषय सुचविले आहेत.*

*संदर्भसूची - संशोधन समस्येच्या संदर्भातील संदर्भ ग्रंथाची सूची याम विहीत नमुन्यात दिली आहे.*

## संदर्भ ग्रंथ सूची


| | |
|---|---|
| 1. डॉ. भित्ताडे वि.रा. | "शैक्षणिक संशोधन पध्दती" नूतन प्रकाशन, पुणे–30, प्रथमावत्ती नोव्हें–1989<br>टोटल पेजेस 168 |
| 2. डॉ. बापट भा.गो. | "शैक्षणिक संशोधन" नूतनप्रकाशन,पूणे–30 प्रथमावत्ती – 1975.<br>टोटल पेजेस 208 |
| 3. डॉ. कुलकर्णी,प्रा.फेगडे व.का. | "अनौपचारिक शिक्षण" नूतनप्रकाशन, पूणे–30 प्रथम आवत्ती–1974<br>टोटल पेजेस 127 |
| 4. डॉ. चित्रा नाईक | 1. राष्ट्रीय साक्षरता मिशन<br>2. साक्षरता स्वयंसेवक मार्गदर्शिका<br>अनौपचारिक शिक्षण साधन केंद्र, महाराष्ट्र इंडियन इन्स्टीटयूट एज्युकेशन, पूणे. |
| 5. प्रा.थिटे जे.टी.<br>सोलापूर सोशल अ.आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज,सोलापूर. | "निरक्षरता एक सामाजिक कलंक" दि.8.9.1995 दैनिक लोकमत मधील लेख. |